संं.फौ.ख.क्र. ६२/२०२३



सरकार वि. निखिल

निशाणी क्र.२२

**सरकारतर्फे साक्षदार क्रमांक ३ यांची जबानी**

मी याद्वारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,

नाव – मेघा भुमीराज उके

वय – ३२ वर्ष, व्यवसाय – घरकाम

राहणार – गणेश नगर, कन्हान, ता.पारशिवणी, जिल्हा नागपूर

**सरतपास शपथेवर सरकारतर्फे सरकारी अभियोक्ता एस.व्ही. रामटेके यांच्यातर्फे**

१. घटना दिनांक ११/०९/२०२२ रोजी संध्याकाळी ६.०० ते ७.०० वाजताच्या दरम्यान तारसा रोड घडली होती. त्यावेळी मी, माझा नवरा व मुलगा वेदांत असे गाडी घेऊन रोड क्रॉस करण्यसाठी साईडला उभे होतो. त्यावेळी एक मोटरसायकल कामठी कडून आली व आमच्या गाडी धडक दिली. त्यामुळे आम्ही खाली पडलो. माझ्या पतीने उठण्याचा प्रयत्न केला परंतु त्यांना उठता आले नाही. त्यानंतर माझ्या पतीला दोन तीन जणानी उचलून साईडला केले. तेथे जमलेल्या लोकांनी मोटरसायकल चालकाला थांबविले. तेथे जमलेल्या लोकांनी माझ्या पतीला उचलून आशा हॉस्पीटल येथे नेले. तेथे डॉक्टरांनी माझ्या पतीचा उजवा पाय फ्रॅक्चर असल्याचे सांगितले. ज्या मोटरसायकलने आमच्या गाडीला धडक दिली होती तिचा क्रमांक एम.एच.–४०–ए.एन.–६९२७ असा होता. मोटरसायकल चालकाला बघितल्यास मी ओळखू शकते. आज रोजी तो न्यायालयात हजर नाही. पोलीसांनी माझे बयान घेतले होते.

**सरतपास पूर्ण**

**उलटतपास आरोपी तर्फे वकील रिना गणवीर यांच्यातर्फे.**

२. पोलीसांना बयान देतांना ' माझ्या पतीला दोन तीन जणानी उचलून साईडला केले. तेथे जमलेल्या लोकांनी मोटरसायकल चालकाला थांबविले' असे सांगितले होते परंतु ही बाब माझ्या जबाबात नमूद नाही याचे कारण मी सांगू शकत नाही. माझ्या पतीने घटनेची फिर्याद कधी दिली याची तारीख माझ्या लक्षात नाही. पोलीसांनी माझे बयान कधी नोंदविले याची तारीख माझ्या लक्षात नाही. हे म्हणणे खरे नाही की घटनेच्या वेळी मी, माझे पती व

सं.फौ.ख.क्र. ६२/२०२३
सरकार वि. निखिल
निशाणी क्र.२२

माझा मुलगा आम्ही रोडच्या साईडला उभे असल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की उपरोक्त मोटरसायकलने आमच्या गाडीला धडक दिल्याचे व आम्ही खाली पडल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की माझ्या पतीचा तोल गेल्यामुळे आम्ही खाली पडलो. हे म्हणणे खरे नाही की माझ्या पतीला झालेल्या जखमा करीता ते स्वतः जबाबदार आहे. हे म्हणणे खरे नाही की उपरोक्त मोटरसायकलचा क्रमांक मी माझे बयान वाचून सांगत आहे.हे म्हणणे खरे आहे की आम्ही अपघाताचे नुकसान भरपाई मिळण्याकरीता प्रकरण केले आहे. हे म्हणणे खरे नाही की नुकसान भरपाई मिळण्याकरीता आम्ही आरोपी विरुध्द खोटी केस केली आहे. हे म्हणणे खरे नाही की आज रोजी मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास संपला.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत/समक्ष

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by RAJESH RAMESHRAO SHEREKAR
Date: 2024.07.05 15:58:03 +0530

**(रा.र. शेरेकर)**
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, न्या. क्र. ३, कामठी.

ठिकाण –कामठी
दिनांक –०५/०७/२०२४